मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 3 ऑगस्ट 2024 | पान- 1

# डासोत्पत्ती ठिकाणे आढळल्यास दंडात्मक कारवाई करा : शेखर सिंह

## अधिकारी कर्मचाऱ्यांसमवेत आढावा बैठकीतआयुक्तांचे निर्देश : आजारांना आळा घालण्यासाठी महापालिकेची तपासणी मोहीम

**पिंपरी | प्रतिनिधी**

किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने व्यावसायिक आस्थापना, गृह सोसायट्यांसह घरांची तपासणी मोहीम तीव्र करून डासोत्पत्ती ठिकाणे आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करा, असे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी प्रशासनाला दिले. शहरात किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते.

शहरात किटकजन्य आजारांना आळा घालण्यासाठी महापालिकेच्या वतीने सर्व भागात तपासणी मोहीम राबविण्यात येत असून 1 जून ते 31 जुलै या दोन महिन्यांच्या कालावधीत सुमारे 22 लाख रुपयांपेक्षा अधिक दंड वसूल करण्यात आला आहे. डेंग्यू तसेच झिका सारख्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य आणि वैद्यकीय विभागामार्फत संयुक्त मोहीम राबवली जात आहे



### मोहीम तीव्र करण्यात येणार

» तपासणी मोहीम तीव्र करण्यात येणार असून तपासणी पथकांची संख्या देखील वाढवली जाणार आहे. क्षेत्रीय कार्यालय स्तरावरील सर्व सहाय्यक आरोग्य अधिका-यांना याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार पथकाद्वारे सर्व गृह सोसायट्यांना भेटी देऊन तपासणी अंती डासोत्पत्ती ठिकाणे आढळल्यास महापालिकेच्या वतीने दंडात्मक कारवाई केली जाईल, असे आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे यांनी सांगितले.

### नागरिकांवर दंडात्मक कारवाई

» 1 जून ते 31 जुलै या दोन महिन्यांच्या कालावधीत 'अ' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत 60 हजार 384 घरांची तपासणी करून 106 नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन सुमारे र लाख 51 हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. 'ब' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत 24 हजार 704 घरांची तपासणी करून 79 नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन सुमारे 4 लाख 45 हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. 'क' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत 51 हजार 915 घरांची तपासणी करून 37 नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन सुमारे 96 हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

> आरोग्य व वैद्यकीय विभागामार्फत क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली संयुक्तपणे तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी आपल्या घरात तसेच परिसरात डासोत्पत्तीची ठिकाणे निर्माण होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. प्रत्येक आठवड्यात आपले घर आणि परिसराची स्वच्छता करून आपली व आपल्या कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घ्यावी.
>
> - विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, ,पिंपरी-चिंचवड, महापालिका

# अतिक्रमणांवर कारवाई न करणाऱ्या सहा क्षेत्रिय अधिकारी यांच्यासह 9 अधिकाऱ्यांना नोटिस

## शहरातील विविध भागात गेल्या काही दिवसांपासून अनधिकृत बांधकामे, पत्राशेड, हॉटेल्स, पब आणि बारचा प्रश्न ऐरणीवर आला आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील विविध भागात गेल्या काही दिवसांपासून अनधिकृत बांधकामे, पत्राशेड, हॉटेल्स, पब आणि बारचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशा अनधिकृत बांधकामे, पत्राशेडवर नियंत्रण मिळविण्यात अपयशी झालेल्या आणि कारवाई न करणाऱ्या अतिक्रमण निर्मूलन विभागाचे उपायुक्त, सहा क्षेत्रिय अधिकारी यांच्यासह नऊ अधिकाऱ्यांना नोटीसा दिल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड शहरातून पवना, इंद्रायणी आणि मुळा या तिन्ही नद्या वाहत आहेत. या नदीकाठी मोठ्या प्रमाणात भराव आणि अतिक्रमणे झाली आहेत. त्यामुळेच नुकत्याच झालेल्या पावसात नदीकाठच्या रहिवासी भागात पाणी शिरल्याच्या घटना घडल्या. तसेच शहरातील विविध भागातही अनधिकृत बांधकामे, पत्राशेड, पादचारी मार्गावरील अतिक्रमणांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यावर कारवाईसाठी महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाकडून कानाडोळा केला जात होता.

त्यामुळे अतिक्रमण निर्मूलन विभागाचे उपायुक्त, सहा क्षेत्रिय अधिकारी, दोन बीट निरीक्षक अशा नऊ जणांना नोटीसा बजावल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त जांभळे-पाटील यांनी दिली. तसेच नदीकाठच्या अतिक्रमण धारकांना वॉर्निंग देणे, अतिक्रमणे काढून घेण्याबाबत सूचना दिल्या आहेत. अशा अतिक्रमणांवर आता कारवाई करायची की पावसाळ्यानंतर कारवाई करायची याबाबत आयुक्तांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहे. दरम्यान, शहरातील कोणत्या भागात अतिक्रमणे झाले, किती अतिक्रमण धारकांना नोटीसा दिल्या, कितींवर कारवाई केली याची माहिती व्हावी येत आहे.



### अतिक्रमण निर्मूलन विभागाकडून कानाडोळा

» नुकत्याच झालेल्या पावसात नदीकाठच्या रहिवासी भागात पाणी शिरल्याच्या घटना घडल्या. तसेच शहरातील विविध भागातही अनधिकृत बांधकामे, पत्राशेड, पादचारी मार्गावरील अतिक्रमणांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यावर कारवाईसाठी महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाकडून कानाडोळा केला जात होता.

### स्वतंत्र ॲप विकसित

» अतिक्रमणांवर आता कारवाई करायची की पावसाळ्यानंतर कारवाई करायची याबाबत आयुक्तांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहे. दरम्यान, शहरातील कोणत्या भागात अतिक्रमणे झाले, किती अतिक्रमण धारकांना नोटीसा दिल्या, कितींवर कारवाई केली याची सर्व माहिती व्हावी यासाठी महापालिकेच्या वतीने एक स्वतंत्र ॲप विकसित करण्यात येत आहे.

# पुणे-दिल्ली वंदे भारत स्लिपर ट्रेनसाठी वेगवान हालचाली : मुरलीधर मोहोळ

## केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचा सकारात्मक प्रतिसाद, वंदे भारत मेट्रो सेवा लवकरच सुरु होणार

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात वंदे भारत एक्स्प्रेस सुरु आहेत. राज्यातील पहिली वंदे भारत एक्स्प्रेस मुंबईवरुन गांधीनगर सुरु झाली होती. त्यानंतर मुंबई-गोवा, मुंबई-सोलापूर, मुंबई-शिर्डी, मुंबई-जालना या मार्गावर वंदे भारत एक्स्प्रेस धावत आहेत. पुणे शहरातून स्वतंत्र वंदे भारत एक्स्प्रेस अजून सुरु झालेली नाही. मुंबई-सोलापूर वंदे भारत एक्स्प्रेस पुण्यावरुन जाते. परंतु आता पुणे-दिल्ली वंदे भारत स्लिपर ट्रेनसाठी वेगवान हालचाली सुरु झाल्या आहेत. यासंदर्भात केंद्रीय नागरिक उड्डयन आणि सहकार राज्यमंत्री मुरलधीर मोहोळ यांनी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी त्यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. त्या भेटीत पुण्यावरुन वंदे भारत स्लिपर ट्रेन, वंदे मेट्रो ट्रेनबाबत चर्चा झाली. त्यामुळे येत्या काही दिवसांत पुणे-दिल्ली स्लिपर वंदे भारत ट्रेन सुरु होण्याची शक्यता आहे.

खासदार मुरलीधर मोहोळ यांनी गुरुवारी राष्ट्रीय राजधानीत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी झालेल्या त्यांच्या भेटीचा तपशीला ट्विटरद्वारे शेअर केला. नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, यांनी X वर ट्वीट करत सांगितले की केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव जी यांची रेल्वे भवन, नवी दिल्ली येथे भेट घेतली. पुणे-दिल्ली वंदे भारत स्लीपर ट्रेन सर्व्हिसेस', 'पुणे-लोणावळा रेल्वे मार्ग विस्तार', 'पुणे-अहिल्यानगर रेल्वे' यासारख्या रेल्वेशी संबंधित बहुविध विकास संभावना कनेक्टिव्हिटी', 'पुणे रेल्वे स्थानकाचे भव्य सुधारणे', 'उरुळी येथे नवीन टर्मिनलचा विकास' यावर चर्चा झाली. पुणे विभागातील रेल्वेच्या अनेक विकास संभावनांवर चर्चा केली, ज्यात पुणे रेल्वे स्थानकाच्या सुधारणेचा समावेश आहे. ते पुढे म्हणाले, "महत्त्वाचे म्हणजे, देशभरातील प्रमुख शहरांना जोडण्याच्या उद्देशाने रेल्वेमंत्र्यांनी आज वंदे भारत मेट्रो सेवा जाहीर केली. त्या संदर्भात, मी तातडीने पुण्यापासून नाशिक, सोलापूर, यांसारख्या शहरांमध्ये वंदे भारत मेट्रो सेवांचा विचार करण्याची विनंती केली."



### पुणे-लोणावळा रेल्वे मार्गाचा विस्तार

» याबाबत माहिती देताना केंद्रीय मंत्री मोहोळ म्हणाले, पुणे-दिल्ली वंदे भारत स्लिपर ट्रेन, पुणे-लोणावळा रेल्वे मार्गाचे विस्तारीकरण, पुणे-अहिल्यानगर रेल्वे कनेक्टिव्हिटी, पुणे रेल्वे स्थानकाचे नूतनीकरण, उरुळी कांचन येथे नवे टर्मिनल आदी विषयांवर सविस्तर चर्चा झाली. या सर्व विषयांवर वैष्णव यांनी सविस्तर माहिती दिली. तसेच आगामी काळातील कृती आराखड्याबाबतही चर्चा केली.

### अशी झाली दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा

» रेल्वेच्या पुणे आणि विभागातील विविध प्रलंबित विषय मार्गी लावण्यासंदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. गेली अनेक वर्षे प्रलंबित असणारे प्रश्न मार्गी लावतानाच पुण्यातून वंदे भारत ट्रेन सुरु कराव्यात, यावर सकारात्मक चर्चा झाली. विशेष म्हणजे वैष्णव यांनी प्रलंबित विषय मार्गी लावण्यासंदर्भात प्रत्यक्ष नकाशावर सविस्तर माहिती दिली.

### वंदे मेट्रो सेवा लवकरच

» गुरुवारी लोकसभेतील भाषणात रेल्वेमंत्र्यांनी देशातील महत्वाच्या महानगरांना जोडणारी वंदे भारत मेट्रो सेवा लवकरच सुरू होणार असल्याची घोषणा केली. या अनुषंगाने पुण्याहून नाशिक, मुंबई, सोलापूर, नागपूर या महानगरांसाठी वंदे भारत मेट्रोचा विचार व्हावा, या संदर्भातही चर्चा केली, अशीही माहिती मोहोळ यांनी दिली.

### रेल्वे मंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद

» पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रातील रेल्वेचे अनेक विषय गेली काही वर्षे प्रलंबित आहेत. त्यावर लवकरात लवकर तोडगा काढला जावा, यासाठी केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी पुढाकार घेतला आहे. प्रलंबित विषय मार्गी लावण्यासाठी रेल्वेमंत्र्यांनी सकारात्मकता दाखवल्याने हे विषय लवकरच मार्गी लागणार आहेत.

# शहरातील खड्ड्यांवर आता पुणे पोलिसांची करडी नजर; करणार अशी कारवाई

## मुसळधार पावसाने कहर केल्याने रस्त्यात खड्डे की, खड्ड्यात रस्ता अशी परिस्थिती, रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी एक अनोखी शक्कल

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील अनेक शहरातील रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. काही भागात मुसळधार पावसाने कहर केल्याने रस्त्यात खड्डे की, खड्ड्यात रस्त्यात अशी परिस्थिती आहे. त्यातच पुण्यातील रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी एक अनोखी शक्कल लढविण्यात आली आहे.

राज्यातील अनेक शहरातील रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. या रस्त्यांवरुन वाट काढताना वाहनधारकांची तारांबळच उडते असे नाही तर कसोटी लागते. त्यातच मुसळधार पावसाने मोठ्या शहरातील रस्त्यांवर खड्ड्यांची रांगोळी काढली आहे. पुण्यात पण अनेक रस्त्यांची चाळण झाली आहे. रस्त्यांवरील खड्डे चुकविताना अपघाताला पण निमंत्रण मिळते. त्यामुळे पुणे पोलीस ॲक्शन मोडवरआहेत. पुण्यातील खड्ड्यांवर पण पोलिसांची करडी नजर आहे. खड्डयातील दणक्यांमुळे वाहनधारकांची हाडं खिळखिळी होत आहे. इतके खड्डे असून महापालिकेच्या पथविभागाला हे खड्डे काही केल्या दिसत नसल्याचे चित्र आहे. त्यांच्या लेखी शहरात अवघे ५३ खड्डे आहेत. त्यामुळे पुणेकरांनी संताप व्यक्त केला आहे.



### तक्रार आली तर मलमपट्टी करणार

» पुण्यातील अनेक रस्त्यांवर खड्डे असताना पथ विभागाने मात्र अजब भूमिका घेतली आहे. हेल्पलाईन क्रमांकावर कॉल केल्यास अथवा ऑनलाईन तक्रार आल्यास खड्डा बुजविण्याची प्रक्रिया केली जात असल्याचे समोर येत आहे. म्हणजे रस्त्याची चाळण झालेली असली तरी तक्रार येत नसल्याने खड्डे न बुजविण्याचा प्रताप समोर आला आहे. यावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

### पोलिसांची करडी नजर

» पुणे शहरातील खड्डयांवर आता पुणे पोलिसांची करडी नजर आहे. लवकरात लवकर खड्डे बुजवा नाही तर पुणे पोलीस गुन्हा दाखल करणार आहेत. पुणे महापालिकेच्या अभियंता, ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल होणार आहे. खड्डे बुजवले नाही तर पुणे महापालिकेच्या ठेकेदार, अभियंता यांच्यावर गुन्हे दाखल होणार आहेत.

### रस्त्यांवर 544 खड्डे

» पुण्यातील ३१७ जंक्शन वर तब्बल ५४४ खड्डे असल्याचे समोर येत आहे. शहरातील अनेक रस्त्यांवर अनेक खड्ड्यांची जणू एक माळच तयार केली आहे. यामुळे शहरातील वाहनांचा वेग कमी झाला आहे. शहरातील काही भागात वाहतूक कोडींचा सामना करावा लागत आहे. तर खड्डयातील दणक्यांमुळे वाहनधारकांची हाडं खिळखिळी होत आहे. इतके खड्डे असून महापालिकेच्या पथविभागाला हे खड्डे काही केल्या दिसत नसल्याचे चित्र आहे. त्यांच्या लेखी शहरात अवघे ५३ खड्डे आहेत. त्यामुळे पुणेकरांनी संताप व्यक्त केला आहे.

# 30 वर्षे जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे बंधनकारक

## एका महिन्याच्या आत आपल्या इमारतीचे संरचनात्मक लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करून घेणे बंधनकारक

**पिंपरी | प्रतिनिधी**

३० वर्षे जुन्या इमारती किंवा मिळकती राहण्यासाठी योग्य आहेत किंवा नाही हे तपासण्यासाठी महापालिकेकडील परवानाधारक बांधकाम अभियंता यांच्याकडून तपासणी करणे आणि दुरुस्ती करून घेणे महत्वाचे असून नागरिकांनी एका महिन्याच्या आत आपल्या इमारतीचे संरचनात्मक लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करून घेणे बंधनकारक असल्याची माहिती शहर अभियंता मकरंद निकम यांनी दिली.




**बांधकाम अभियंता नोंदणीसाठी पात्रता आणि अर्हता ही पुढील प्रमाणे -**

» कोणत्याही मान्यताप्राप्त भारतीय किंवा विदेशी विद्यापीठातील स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी असणे महत्वाचे आहे. तसेच सनदी अभियंता किंवा भारतीय अभियांत्रिकी संस्थेच्या समतुल्य विदेशी संस्थेच्या स्थापत्य अभियांत्रिकी सहयोगी सदस्य असणे महत्वाचे आहे.

» बांधकाम अभियंता यांना संकल्प चित्र काढण्याचा, क्षेत्र कामे करण्याचा,बांधकाम अभियंता व्यवसायातील किमान ३ वर्षांचा अनुभव असणे महत्वाचे आहे.

» बांधकाम अभियंता शाखेतील कोणत्याही मान्यताप्राप्त भारतीय विद्यापीठाची किंवा विदेशी विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत २ वर्षे आणि बांधकाम अभियंता या विषयातील डॉक्टरेट धारण करणाऱ्या व्यक्तीबाबत ही अट एका वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.

राज्य शासनाच्या अधिसूचनेनुसार आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २६५(अ) कलमानुसार जुन्या इमारती अथवा मिळकती राहण्यायोग्य आहेत किंवा नाही याबाबत महापालिकेकडील परवानाधारक बांधकाम अभियंत्याकडून तपासणी व दुरुस्ती करून घेणे आवश्यक आहे. तसेच बांधकाम सुस्थितीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तरतूद आहे. त्यानुसार जुन्या इमारतींचे लेखापरीक्षण करणे बंधनकारक आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील ज्या इमारतींचे बांधकाम ३० वर्षे जुने आहे, अशा सर्व इमारतींचे मालक, वारसदार, भोगवटादार यांना इमारतींचे बांधकाम सुस्थितीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र महापालिकेतील परवानाधारक बांधकाम अभियंता (स्ट्रक्चरल इंजिनियर) यांच्याकडून घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. हे प्रमाणपत्र प्रत्येक १० वर्षांनी इमारत मालक, वारसदार, भोगवटादार यांनी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

जुने बांधकाम सुस्थितीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र इमारत मालकांना देण्यासाठी परवानाधारक बांधकाम अभियंता यांच्याकडे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा परवाना असणे महत्वाचे असून त्यासाठी बांधकाम अभियंता यांनी महापालिकेकडे आवश्यक असलेली कागदपत्रे जोडून अर्ज करावा. अर्ज आणि कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर १ हजार रुपये परतावा शुल्क आकारण्यात येईल. त्यानंतर बांधकाम अभियंता यास ३ वर्षासाठी परवाना देण्यात येईल.

**बांधकाम अभियंता यांना महापालिकेकडून परवाना मिळवण्यासाठी नियम व अटींची पूर्तता करावी लागणार..**

बांधकाम अभियंता यांनी अर्ज केल्यानंतर त्यांच्या पात्रतेसंबंधित पडताळणी करण्यात येणार असुन त्यानंतर गुणात्मक विचार करून प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. बांधकाम अभियंता यांच्याबाबत काही शंका असल्यास अर्ज अपात्र करण्याचा संपूर्ण अधिकार शहर अभियंता मकरंद निकम यांच्याकडे असणार. स्ट्रक्चरल ऑडीट साठी आकारण्यात येणारे शुल्क संबंधित अभियंत्यांनी इमारतीच्या मालकांकडून घ्यावे. इमारत बांधकामदृष्ट्या सुस्थितीत आहे की नाही याबाबत बांधकाम अभियंत्याकडून करण्यात येणाऱ्या संरचनात्मक लेखानिरीक्षणामध्ये (STRUCTURAL AUDIT) बांधकाम सुस्थितीची तपासणी करून अविघातक चाचणीबरोबरच इतर चाचण्या तसेच अभिलेखाची तपासणी करण्यात येईल.

जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यासाठी बांधकाम अभियंता यांना पिंपरी चिंचवड महापालिकेचा परवाना देण्यासाठी लागणा-या सर्व कागदपत्रांची यादी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर आणि शहर अभियंता कार्यालयात उपलब्ध करण्यात आली आहे.

बांधकाम अभियंता म्हणून नोंदणी करण्यासाठी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील स्थापत्य विभागात शहर अभियंता यांच्याकडे आवश्यक कागदपत्रे, लेखी अर्ज हे एका महिन्याच्या आत सादर करावे. त्यानंतर बांधकाम अभियंत्यांची नोंदणी यादी तयार करण्यात येईल. ही नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेल्या दिनांकापासून ३ वर्षासाठी वैध असणार आहे. तसेच कोणताही अर्ज स्वीकारण्याचा आणि फेटाळण्याचा हक्क पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्याकडे राहील.

# सेक्टर 12 गृहप्रकल्पात भाडेकरू ठेवता येणार नाही

## पीएमआरडीए प्रशासनाने काढली नोटीस, नियमाचे पालन न झाल्यास कारवाई होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) भोसरी स्पाईन रोड रस्त्यावर सेक्टर १२ या ठिकाणी गृहप्रकल्प उभारला आहे. जवळपास साडेचार हजार घरांचा हा प्रकल्प आहे. पहिला टप्पा पूर्ण झाला दुसऱ्या टप्प्याचे कामही सुरू झाले. दरम्यान, नुकतेच बांधण्यात आलेल्या सोसायटीचे वर्ष पूर्ण होत आहे. त्यामुळे आता सोसायटीची देखभाल स्वतंत्र राहणार आहे. याच धर्तीवर आता भाडेकरू ठेवण्याच्या विषयावर रहिवाशांमध्ये वादावादी होत आहे. यामध्ये प्राधिकरणाने थेट नोटीस काढून भाडेकरू ठेवता येणार नाही असे स्पष्ट केले.

सेक्टर १२ या ठिकाणी उभारल्या सोसायटींचे देखभाल आणि सर्व जबाबदारी ही प्राधिकरणाकडे होती. मात्र, आता वर्ष पूर्ण झाल्यानंतर संबंधित सोसायटीची जबाबदारी त्या त्या सोसायटीकडे राहणार असून, त्याबाबत पदाधिकारी नेमलेले आहेत. मात्र आता नव्याने झालेल्या सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी भाडेकरू ठेवण्यास विरोध दर्शवला आहे. त्यामुळे भाडेकरू ठेवलेल्या सदनिका धारकांनी पीएमआरडीए धाव घेतली आहे. यापूर्वी पीएमआरडीएकडे जबाबदारी असल्याने कोणतीही अडचण निर्माण झाली नव्हती. मात्र, सोसायटीची नोंदणी झाल्याने त्यांची गोची झाली आहे. दरम्यान



जवळपास २० ते २५ सदनिकाधारक या तक्रारीसाठी अधिकाऱ्यांना भेटले. मात्र त्यात कोणतीहा तोडगा निघाला नाही. अधिकाऱ्यांनी नियमांवर बोट ठेवून त्यांना माघारी पाठवले.

दरम्यान, सोसायटी निर्माण झाल्याने त्याबाबत प्राधिकरणाचा हस्तक्षेप कमी झाला आहे. सदनिकाधारकांनी भाडेकरू ठेवू नये, याबाबत आधीच सूचना दिली आहे. तसे पत्रक काढण्यात आले असून, प्रत्येक सोसायटीधारकांना त्याबाबत कळवण्यात आले आहे. त्याचप्रमाणे संकेतस्थळावर देखील प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे भाडेकरू ठेवण्याचे निदर्शनास आल्यास कारवाई देखील करण्यात येणार आहे.

**सेक्टर 12 मधील नागरिकांचे गाऱ्हाणे सुरूच**

» सेक्टर १२ येथील पहिल्या टप्प्यातील रहिवाशांच्या समस्या अजूनही सुटल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्या तक्रारी अद्याप सुरू आहेत. पावसाळ्यामध्ये देखील काही ठिकाणी गळती होत असल्याच्या तक्रारी आहेत. तर, खिडक्यांचा काचा खाली कोसळून अपघाताची शक्यता येथील रहिवाशांनी व्यक्त केली आहे.

**'ते' बांधकाम व्यावसायिक अडचणीत**

सेक्टर १२ येथील येथील पहिल्या टप्प्यातील बांधकाम करणारे दोन बांधकाम व्यवसाय अडचणीत आले आहेत. पीएमआरडीए आयुक्तांनी सेक्टर १२ येथील रहिवाशांच्या समस्यांवर स्वतंत्र बैठक घेतली होती. त्यामध्ये काही त्रुटी आढळून आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे बांधकाम व्यवसायांच्या चुका निदर्शनास आल्या. संबंधित बांधकाम व्यवसायिकांवर दंडाची नोटीस देखील दिली होती. त्यासंबंधीचा अहवाल आयुक्तांच्या टेबलावर ठेवण्यात आलेला आहे.

# मुळा-मुठा नदीकाठ सुशोभीकरणाची लागली वाट

## मुळा-मुठा नदीकाठ सुशोभीकरणातील हजारो डंपर दगड, माती पाण्यात : बंडगार्डन पूल बंधाऱ्यातून वाहणाऱ्या वेगवान प्रवाहाचा परिणाम

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका केंद्र सरकारच्या विशेष निधीतून मुळा-मुठा नदीकाठ सुशोभीकरण (जायका) प्रकल्प राबवत आहे. यासाठी मुळा-मुठा नदीकाठावर हजारो डंपर दगड, माती टाकून सुशोभीकरण करण्यात आले होते. मात्र मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे हजारो डंपर दगड, माती वाहून गेली असून नदीकाठ सुशोभीकरणाची वाट लागली आहे.



गेली तीन वर्षांपासून जायका प्रकल्पाचे काम सुरू आहे. या काळात मोठा पाऊस न झाल्यामुळे मुळा-मुठा नदी दुथडी भरून वाहिली नव्हती. मात्र, पुणे शहर आणि धरण परिसरात जुलै महिन्यात विशेषतः मागील आठवड्यात उच्चांकी पाऊस झाला. यामुळे मुळा-मुठा नदीकाठावरील दगड आणि माती मोठ्या प्रमाणात वाहून गेले आहे. त्यामुळे जायकाच्या मर्यादा उघड पडल्या आहेत.

पुणे महापालिकेच्या वतीने १० ते १२ वर्षांपूर्वी काही कोटी रुपये खर्च करून मुळा-मुठा नदीकाठ सुधारणा करण्यात आली होती. त्यासाठी हजारो ट्रक माती आणि घडीव दगड विशिष्ट पद्धतीने ठेवण्यात आले होते. त्यामुळे नदीकाठावरील झुडपांची वाढ होऊन नदीच्या पाण्यातील अशुद्ध घटक शोषून घेऊन पाणी शुद्ध होणार होते. बंडगार्डन ते ताडीवाला रस्ता तर दुसऱ्या बाजूला माळी महाराज विसर्जन घाट ते शाहदावल बाबा दर्ग्यापर्यंत काम झाले होते. त्यानंतर पुन्हा २०२२ मध्ये पुणे शहरात जी-२० च्या प्रतिनिधींच्या बैठका झाल्या. यासाठी महापालिकेच्या वतीने युद्धपातळीवर तयारी केली गेली होती. मुळा-मुठा नदीचे प्रदूषण नियंत्रण करणे याअंतर्गत पुन्हा बंडगार्डन येथील मुळा-मुठा नदीकाठ सुशोभीकरण करण्यासाठी घेतले आहे.

या भव्य प्रकल्पाचे काम बी.जी. शिर्के कंपनीला दिले आहे. त्यामुळे याठिकाणी दिवस-रात्र काम सुरु होते. मेट्रो मार्गात निघालेले मोठे दगड या ठिकाणी आणून पुन्हा नदीकाठावर टाकण्यात आले. काही मीटर नदीकाठाचे सुशोभीकरण करून ते पाहुण्यांना दाखविण्याचा केविलवाणा प्रयत्न महापालिकेने केला.

मुळा-मुठा नदीकाठावरील लाल व निळ्या रेषांचा विचार न करता ही कामे सुरू आहेत. पावसाळ्यात विशेषतः पूर परिस्थितीत बंडगार्डन पुलाखालून प्रचंड वेगाने मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असते. अशा वेळी कोटयवधी रुपये खर्च करू नदीकाठ सुधार प्रकल्प पाण्यात जाण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तविली होती. दगड, माती पाण्यात जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे बंधाऱ्यातील साठा कमी होऊन मागे फुगवटा निर्माण होणार आहे. त्याचा परिणाम म्हणून पुराचे पाणी ताडीवाला रस्ता आणि पाटील इस्टेट परिसरातील घरांमध्ये शिरू शकते. याचा विचार ना महापालिकेच्या आपत्कालीन यंत्रणेने केला आहे ना राज्य सरकारने.

जायका प्रकल्प चांगला असला तरी यामध्ये नागरिकांना सहभागी करून घेण्यात आलेले नाही. शहरातील अनेक सामाजिक संघटना आणि पर्यावरणवादी मंडळींचा याला विरोध आहे. हा विरोध झुगारून महापालिकेने न्यायालय, हरित लवाद न्यायालयात युक्तिवाद करून प्रकल्प रेटला. मात्र, या पावसाळ्यात या प्रकल्पाच्या मर्यादा दिसून आल्या. काही टन माती आणि दगड पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याने जायका प्रकल्पाच्या व्यवहार्यतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### पर्यावरणवाद्यांच्या सूचनांचा केला नाही विचार

» अहमदाबाद येथील नर्मदा नदीकाठ सुधारणा प्रकल्पाप्रमाणे मुळा-मुठा नदी प्रकल्प करण्याचा विचार महापालिकेचा आहे. मात्र, येथील पावसाचे प्रमाण, पुराच्या पाण्याचा विर्सग याचा विचार केलेला दिसत नाही. मुळा-मुठा नदीकाठावर व्यवसायिकदृष्ट्या जागा भाड्याने देणे, पर्यटनाला चालना देणे, नदीला मिळणारे सर्व नाले एकत्रित जोडून मैलापाणी शुद्धीकरण करणे, नदीतील पाणी प्रवाहित करणे हा उद्देश आहे. मात्र, यामध्ये नागरिकांचा सहभाग, पर्यावरणवाद्यांनी केलेल्या सूचनांचा विचार केला गेल्याचे दिसून येत नाही.

# केंद्रीय हवाई राज्यमंत्र्यांच्या पुण्यातील विमानतळच नापास!

## एअर पोर्ट्स कौन्सिल इंटरनॅशनलच्या वतीने सर्वेक्षण करून विमानतळ सेवा गुणवत्ता (एएसक्यू) निर्देशांक जाहीर

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे विमानतळ प्रवासी सुविधांमध्ये नापास ठरले आहे. विमानतळ सेवा गुणवत्ता निर्देशांकात पुणे विमानतळाचे स्थान घसरले आहे. विमानतळावरील प्रवासी संख्या वाढत असताना प्रवासी सुविधांचा दर्जा घसरत असल्याचे चित्र आहे. सुविधा अपुऱ्या पडू लागल्याने प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे समोर आले आहे. केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे पुण्यातीलच असल्याने भविष्यात विमानतळाचा दर्जा सुधारण्याची अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.




एअर पोर्ट्स कौन्सिल इंटरनॅशनलच्या वतीने सर्वेक्षण करून विमानतळ सेवा गुणवत्ता (एएसक्यू) निर्देशांक जाहीर केला जातो. जगभरातील ९५ देशांतील ४०० विमानतळांचे सर्वेक्षण यासाठी केले जाते. यात देशातील १४ विमानतळांचा समावेश आहे. यंदा एप्रिल ते जून या तिमाहीतील सर्वेक्षणाच्या आधारे पुणे विमानतळ या निर्देशांकात ७६ व्या स्थानी घसरले आहे. पुणे विमानतळाला ५ पैकी ४.८१ गुण मिळाले आहेत. त्याआधीच्या जानेवारी ते मार्च तिमाहीत पुणे विमानतळ ७१ व्या स्थानी होते आणि विमानतळाला ४.८३ गुण मिळाले होते. त्यामुळे विमानतळावरील प्रवासी सुविधांचा दर्जा घसरल्याचे समोर आले आहे.

सेवा गुणवत्ता निर्देशांकात विमानतळावरील ३१ महत्त्वाच्या गोष्टींचा विचार केला जातो. त्यात प्रवेशद्वाराजवळ बसण्यासाठी आसने, प्रवाशांना सहजपणे त्यांचा मार्ग सापडणे, विमानांच्या उड्डाणाची माहिती व्यवस्थित मिळणे, विमानतळ ते टर्मिनल अंतर कमी असणे, विमानतळ कर्मचाऱ्यांची सौजन्यशीलता, वाय-फाय सेवा गुणवत्ता, चार्जिंग स्थानकांची उपलब्धता, मनोरंजन अथवा विश्रामासाठी पर्याय, स्वच्छतागृहे, आरोग्यासंबंधी सुरक्षिततेची काळजी, स्वच्छता आणि वातावरण या इतर गोष्टींचा समावेश आहे. पुणे विमानतळाचे स्थान ३१ पैकी १६ सेवांमध्ये घसरले आहे.

### घसरण नेमकी कुठे?

चेक-इन क्षेत्र सहजपणे न सापडणे
चेक-इन क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची सौजन्यशीलता
सुरक्षा तपासणीचा प्रतीक्षा कालावधी
सुरक्षा कर्मचाऱ्यांची सौजन्यशीलता
विमानतळावरील दुकाने
सीमाशुल्क कर्मचाऱ्यांची सौजन्यशीलता
विमानतळातील आसनव्यवस्था
खानपान सेवेतील कर्मचाऱ्यांची सौजन्यशीलता
वाय-फाय सेवा गुणवत्ता
चार्जिंग केंद्रांची उपलब्धता
मनोरंजन आणि विश्राम सुविधा
स्वच्छतागृहांची उपलब्धता
आरोग्य सुरक्षा
विमानतळावरील स्वच्छता
विविध ठिकाणांना जोडणारी विमाने

> जगभरातील देश आपली विमानतळ सेवा सुसज्ज करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान, प्रवासी अनुकूल दर्जेदार सेवा व सर्वोत्तम प्रवासी अनुभव यावर भर देत आहेत. पुणे विमानतळावरून प्रवास करताना प्रवाशांना सुखद अनुभूती होईल याची काळजी विमानतळ प्रशासनाने घेणे आवश्यक आहे. आता सुरू झालेले नवीन टर्मिनल प्रवाशांच्या अपेक्षांना खरे उतरेल, अशी आशा आहे.
>
> **- धैर्यशील वंडेकर, हवाई वाहतूकतज्ज्ञ.**